RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक—अ-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ७] गुरुवार, मार्च २५, २०२१/चैत्र ४, शके १९४३ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००

## असाधारण क्रमांक ८

## प्राधिकृत प्रकाशन

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमांन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

**विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूका**

**जिल्हादंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक गृहशाखा एमएजी.३/विशेष कार्य अधिकारी/२०२१.—शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.१ कडील निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, **मी, निधी चौधरी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, रायगड** पनवेल महानगरपालिकेच्या पोट निवडणुकीत प्रभाग क्र.१९ ब मधून निर्वाचित झालेल्या सदस्या **श्रीमती रुचिता गुरुनाथ लोंढे** यांची पदसिद्ध **“ विशेष कार्यकारी अधिकारी ”** म्हणून नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिनतेने करीत आहे.

(१) सदरची पदसिद्ध नियुक्ती ५ वर्षाकरीता अथवा पुढील आदेशापर्यंत अथवा सदर व्यक्ती त्या पदावर असेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अस्तित्वात राहील. राज्य शासनास/ जिल्हाधिकारी यांना पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांची ही नियुक्तीवरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही कोणतेही कारण न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील. तथापि, ही मुदत संपताच किंवा नियुक्ती त्यापुर्वीच संपुष्टात आणण्यात आल्यास पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हादंडाधिकारी यांच्या कार्यालयात तात्काळ जमा करण्यात यावे.

(२) उपोद्घातातील शासन निर्णयाद्वारे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्त्या मानसेवी असल्यामुळे पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कामाबाबत कोणतेही मानधन वेतन/भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

(३) पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीमुळे केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार प्राप्त होतील व मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय साक्षांकन करू नये. तसेच साक्षांकन करतांना विहित रबरी शिक्यासह सही करून सहीखाली दिनांक नमूद करणे बंधनकारक राहील.

(४) मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर साक्षांकन करता येणार नाही. जर वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर सत्यप्रत म्हणून साक्षांकन केल्यामुळे व होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणांमाकरिता पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. तसेच अशी घटना उघडकीस आल्यास पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येऊन पुर्ननियुक्तीस अपात्र ठरतील.

(५) पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीमुळे घरावर दुकानावर/कार्यालयावर स्वतःच्या नावासह पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी असा फलक लावणे बंधनकारक आहे. तथापि, त्यांच्या कुठल्याही वाहनांवर पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी असा उल्लेख करू नये. तसेच पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढणे बंधनकारक आहे.

(६) पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीमुळे ओळख परेड तसेच मृत्युपुर्व जबानी यासाठी उपस्थित राहता येणार नाही.

(७) पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांना उत्पन्न प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही.

(८) नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(९) नियुक्तीच्या कालावधीत किंवा कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांच्या विरुद्ध गुन्ह्याची नोंद आढळल्यास त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (Bankrupt) जाहीर केले असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपुर्व रद्द करण्यात येईल.

अलिबाग,
दिनांक २२ मार्च २०२१.

**निधी चौधरी,**
जिल्हादंडाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.